# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची बुधवार दि.३/२/२०१० रोजी झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२३ वी बैठक बुधवार दि.३.२.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | अध्यक्ष |
| २) | श्री. जी.डी.जयस्वाल | सहमुख्य अधिकारी |
| ३) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ४) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ५) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा. श्री. तारीक फारुकी | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ९) | मा.श्री.हेमराज शहा | सदस्य |
| १०) | मा.श्री. व्ही.जी.नायर. | सदस्य |
| ११) | मा.श्री. शरद शिरिसकर | सदस्य |
| १२) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्य |
| १३) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १४) | सहायक कर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | कार्यकारी अभियंत/इमारत प्रस्ताव, म.न.पा. | निमंत्रक |
| १५) | श्री. अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

मा. अध्यक्ष यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत करुन सचिव यांना अर्थसंकल्पीय बैठकीचे कामकाज सुरु करण्याच्या सूचना दिल्या. सचिव श्री. अनिल देशमुख यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व बैठकीचे अध्यक्ष मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक : १२३/१**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.१३.१.२०१० रोजी झालेल्या १२२ व्या बैठकिचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते १५ वर सादर करण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी मंडळाच्या इमारतीतील व संक्रमण शिबीरातील गाळयात राहणा-या रहिवाशांची यादी फलकावर लावण्याच्या कार्यवाहीबाबत विचारणा केली. असता मा.मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, सध्या संक्रमण शिबीरातील गाळेधारकांची

माहिती गोळा करण्याचे काम चालू आहे व सदर काम फेब्रुवारी-२०१० अखेरपर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे. संगणकीकृत अद्ययावत माहिती तयार होण्यास आणखी एक महिना लागेल संबंधित कार्यकारी अभियंता यांना विचारणा केली असता पुनर्रचित इमारतीतील गाळेधारकांची यादी बनविण्याची कार्यवाही चालू असल्याचे सांगितले. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी संबंधित उपमुख्य अभियंता /कार्यकारी अभियंता यांना पुनर्रचित इमारतीतील गाळेधारकांची यादी मार्च २०१० च्या मंडळाच्या बैठकीपूर्वी लावण्याबाबत निर्देश दिले.

मा. सदस्य श्री. किसन बा.जाधव यांनी बँकेमार्फत भाडेवसुली करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता मुख्य लेखाधिकारी यांनी माहिती दिली की, सारस्वत बँकेने कळविल्यानुसार प्रत्येक गाळयामागे दरमहा रु.२५/- खर्च येतो. मंडळाने विचारात घेतलेल्या ४८६६ एवढया गाळयांच्या भाडे वसुलींसाठी बँकेस सुमारे रु.१४,६०,०००/- द्यावे लागतील व तेवढयाच कामासाठी मंडळास रु.७,२०,०००/- इतका खर्च येत असून तीन भाडेवसुलीकार सदर काम करीत आहेत. म्हणून सारस्वत बँकेचा दर जास्त असल्याचे कळविण्यात आले असून सुधारित दर कळविण्याबाबत त्यांना विनंती केली आहे. त्यांच्याकडून सुधारित दर कळविण्यात आल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मा. राज्यमंत्री महोदय मंडळाच्या विविध विषयांबाबत अधिका-यांसोबत बैठक घेण्यास तयार असून त्यांची तारीख घेण्यास सुचविले. मा. मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी व अन्य सदस्यांनीही सदरहू बैठकीची तारीख मिळणेबाबत मा.मंत्री महोदयांना विनंती केल्यास लवकर तारीख मिळेल असे सुचविले.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी असे निदर्शनास आणले की, सामाजिक कार्य करणा-या संस्थांना संक्रमण गाळे वितरीत करण्याबाबत निर्णय झाला असून त्यास अनुसरुन त्यांनी दि. २९ जूलै २००९ रोजी अर्ज देऊन देखील अद्याप त्यांनी शिफारस केलेलया संस्थेस संक्रमण गाळे वितरीत करण्यात आलेले नाहीत. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी (सं.गा.) यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांचा अर्ज प्रचलित नियमाप्रमाणे विचारात घेऊन संबंधित संस्थेस नियमाप्रमाणे गाळे वितरीत करण्याची कार्यवाही लवकरात लकवर करावी.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणले की, कार्यवृत्तांतात " जे गाळे विकले जाणार नाहीत ते गाळे लिलाव पध्दतीने विकण्यासाठी पर्याय उपलब्ध राहील. ज्याला परवडेल तो गाळा विकत घेईल. हे शक्य नसेल तर सदर गाळे विकण्यासाठी मुंबई मंडळाकडे वर्ग करण्यात यावेत " असे जे नमूद करण्यात आले आहे ते चुकीचे आहे. त्यात सुधारणा करावी. जर गाळे विकेले गेले नाहीत तर जून्या दराप्रमाणे गाळे विक्री करण्यात यावी असे त्यांचे मत असल्याचे निदर्शनास आणले. यावर मा. मुख्य अधिकारी यानी सचिव यांना सूचना दिल्या की,

मा. सदस्यांच्या सूचनेची नोंद घेउन त्यांनी निदर्शनास आणलेला भाग सुधारित करुन गाळे विक्रीचे धोरण सुधारित करुन प्रस्ताव मंडळासमोर संबंधितानी सादर करावा.

मा.सदस्य श्री.बांदिवडेकर यांनी अशी सूचना केली की, रेडी रेकनरचा प्रचलित दर नवीन इमारतीना लावला जातो व मंडळाच्या इमारती हया २०-२५ वर्षांपूर्वीच्या आहेत. एवढया जून्या इमारतींना, रेडी रेकनरचा प्रचलित दर लावणे योग्य नाही. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी गाळे विक्रीसाठी रेडीरेकनरचा प्रचलित दर लावण्यात आलेला नसून घसारा विचारात घेऊन दर ठरविण्यात आले आहेत असा खुलासा केला.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कलम ३३(७) खाली ना हरकत प्रमाणपत्राव्दारे पुनर्विकसित झालेल्या इमारतीतील अतिरिक्त गाळे बृहतसूचीवरील गाळेधारकांना वितरीत करण्याबाबत पुढे काय झाले अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. मठपती, उपमुख्य अधिकारी (पु.गा.) हे आज उपस्थित नसल्यामुळे याबाबतची माहिती मा. सदस्यांना पुढील बैठकीत देण्यात येईल असे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मागील बैठकीत असा मुद्दा उपस्थित केला होता की, ३३(७) प्रकरणी ना हरकत प्रमाणपत्र देताना "" ज्या रहिवाशांचे दोन गाळे थोडया अंतरावर म्हणजे दोन तीन गाळे सोडून असतील तर त्यास वेगवेगळे गाळे दिले जातात परंतु ज्या रहिवाशाचे सलग बाजूबाजूचे गाळे असल्यास त्यास दोन वेगवेगळे गाळे दिले जात नाहीत हया निर्णयामुळे अशा रहिवाशांवर अन्याय होत आहे " त्याचा उल्लेख कार्यवृत्तातात आलेला नाही असे त्यानी निदर्शनास आणले व ज्या रहिवाशाचे सलग बाजूबाजूचे दोन गाळे असल्यास व कागदपत्र उपलबध असतील तर त्या रहिवाशास दोन वेगवेगळे गाळे देण्यात यावेत अशी सूचना केली. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २००८ मध्येच मार्गदर्शक सूचना तयार करुन तत्कालिन मुख्य अधिकारी यांनी शासनास सादर केलेल्या आहेत. शासन मंजूरी प्रलंबित आहे. या विषयाबाबत मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी आपल्या सूचना लेखी स्वरुपात दिल्यास त्यावर विचार करुन प्रशासनोच्यावतीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करताना त्यामध्ये वरीलप्रमाणेसुधारणा करुन इतिवृत्तास मंजूरी देण्यास मान्यता देण्यात आली.

सचिव यांनी कार्यवृत्तांतात चुकीची दुरुस्ती आहे असे सांगून पृ.क्र.१४ वर ठराव क्र.१२२/१०२८ मध्ये टंकलेखित चुक झाली असून " एकूण १०० उपकरप्राप्त इमारतींऐवजी ३७ उपकरप्राप्त इमारतीं समजण्यात याव्यात " व तशी नोंद घ्यावी अशी सर्व मा. सदस्यांना विनंती केली. व सदर सुधारणा कार्यवृत्तांत करुन मान्यता देण्यात आली.

वरील सविस्तर चर्चेअंती मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करण्याची नोंद घेऊन कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक १२३/२**

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचा सन २००९-१० चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१०-११ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र.१७ ते १९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सचिव श्री. अनिल देशमुख्य यांनी मुख्य लेखाधिकारी श्री. तपासे यांना विनंती केली की, त्यांनी विषयांकित अर्थसंकल्प बैठकीचे मा.अध्यक्ष तथा उपसभापती व मुख्य अधिकारी श्री.सुभाष हजारे साहेब यांना सुपूर्द करावा व त्यांचे शुभहस्ते अर्थसंकल्पाचे बैठकीत प्रकाशन करावे अशी विनंती केली.

बैठकीचे मा.अध्यक्ष श्री.सुभाष हजारे यांनी सन २००९-१० चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१०-११ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे बैठकीत प्रकाशन केले व सर्व मा. सदस्यांना अर्थसंकल्पाची प्रत वाटप करण्यात आली. मा. मुख्य अधिकारी यांनी श्री. तपासे, मुख्य लेखाधिकारी यांना अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टये व संक्षिप्त माहिती द्यावी अशी सूचना केली.

मुख्य लेखाधिकारी यांनी अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टये सांगताना माहिती दिली की, मंडळाचा २००९-१० चा मुळ अर्थसंकल्प रु.१२.४० कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प होता. तो आता रु.४.२२ कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प आहे व सन २०१०-११ चा अर्थसंकल्प हा रु.५०.६० कोटीचा तुटीचा अर्थसंकल्प आहे. त्याचे कारण दुरुस्ती खर्चाची मर्यादा रु.२०००/- झाल्यामुळे होणारा खर्च हा ग्रॅन्टपेक्षा जास्त होत आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त रु.१०० कोटी शासनाकडून मिळण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्याशिवाय सन २०१०-११ चा अर्थसंकल्पात उपकरप्राप्त इमारतीतील अपघातग्रस्त लोकांना तांतडीचे आर्थिक सहाय्य उपलब्ध होण्याकरिता रु.२५ लाखाची तरतुद करण्यात आली आहे. व सदर तरतुद प्रथमच करण्यात आली आहे. प्राधिकरणाने मंजूर केलेला मंडळाचा बांधकाम कार्यक्रम सुधारित रु. १२८.४२ कोटीचा असून पुढील वर्षीचा रु.१७२.२३ कोटीचा आहे. सदरची तरतुद निधी उपलब्ध असल्यास मिळणार आहे. बांधकाम खर्च हा प्राधिकरणाकडून मिळणारे रु.१० कोटी व शासनाकडून मिळणारे अनुदान यामधून करावा लागतो. यावर्षी मुंबई महानगरपलिकेने उपकराचे रु.६० कोटी शासनाकडे जमा केले आहेत व आणखी रु.६० कोटी असे रु.१२० कोटी शासनाकडून येणे आहे. यापैकी फक्त रु.१३ कोटीचे अनुदान शासनाकडून आतापर्यंत प्राप्त झाले आहे. उर्वरित अनुदानासाठी पाठपुरावा करण्यात येत असून आजपर्यंत मंडळाकडे जमा असलेल्या रक्कमेतूनच सुमारे रु.८०कोटी खर्च केलेला आहे. मुंबई महानगरपालिकेकडून दरवर्षी रु.१० कोटीचे मिळणारे अंशदान गेल्या ६ वर्षापासून मिळालेले नाही. सदर

अंशदानापोटी म.न.पा.कडून सुमारे रु.६० कोटी येणे बाकी आहे. यावर्षी पहिल्यांदाच म.न.पा.ने सन २००७-०८ मधील उपकराची सर्व रक्कम रु.६० कोटी शासनाकडे जमा केले आहेत. वरीलप्रमाणे माहिती दिल्यानंतर सदर अर्थसंकल्प मंजूर करण्याची सर्व मा.सदस्यांना विनंती केली व मंडळाच्या मंजूरी नंतर सदर अर्थसंकल्प प्राधिकरणास सादर करण्यात येईल असे सांगितले.

मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी अर्थसंकल्पावर आपले मत व्यक्त करताना सांगितले की, शासनाकडून, प्राधिकरणाकडून व मुंबई महानगरपालिकेकडून येणारी रक्कम एकूण रु.१२५ कोटी पाहता ही जमेची बाजू आहे. खर्चाची बाजू पाहता या वर्षीचा रु.२२८ कोटी व पुढील वर्षाचा रु.२७६ कोटी दिसून येतात. सन २००९-१० साठी रु.२२४ कोटी जमा होणर असे दाखविले असले तर प्रत्यक्षात रु.१२५ कोटी जमा होणार आहेत. दुरुस्ती खर्चाची मर्यादा वाढविल्यामुळे शासनाकडून येणारे रु.१०० कोटी जर मिळाले तर रु.२२५ कोटी जमा होतील व रु.२२८ कोटी खर्च होतील. तर सन २०१०-११ मध्ये रु.२२५ कोटी जमा होतील व रु.२७६ कोटी खर्च होतील असा अंदाज करण्यात आला आहे. शासनाकडून मिळणारे अंशदान नाही मिळाले तर मंडळास रु. १२५ कोटीमध्ये भागवावे लागेल असे दिसते. सन २००९-१० चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१०-११ चा अर्थसंकल्पामध्ये दुरुस्ती, पुनर्बांधणी, पुनर्रचित इमारतींची चालू विशेष दुरुस्ती, संक्रमण शिबीरांचा पुनर्विकास असा बांधकाम कार्यक्रम दिसत असून त्यामध्ये सन २००९-१० चा खर्च रु.१२८.४२ कोटी दाखविण्यात आला आहे. परंतु जमा रु. १२५ कोटी होणार आहेत. सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पामध्ये सुध्दा जमेची बाजू तेवढीच असून रु. १७२.२३ कोटी खर्च दाखविण्यात आला आहे यामध्ये संक्रमण शिबीराचा पुनर्विकासासाठी रु.७ कोटी दाखविण्यात आला आहे तो अपूरा आहे असे निदर्शनास आणले असता मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, रु.७ कोटी दाखविण्यात आले आहेत ते केवळ कुलाबा संक्रमण शिबीरासाठी आहेत व उर्वरित संक्रमण शिबीरांच्या विकासासाठी मुंबई मंडळाकडून खर्च केला जातो. श्री. तपासे, मु.ले.अ.यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरासाठी रु.७ कोटी दाखविण्यात आले आहेत ते प्राधिकरणाकडून मिळणार आहेत. त्यामुळे ते अतिरिक्त मिळणार आहेत. मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी दुरुस्ती खर्चाची मर्यादा वाढविल्यामुळे खर्चामध्ये वाढ होणार आहे. म्हणून वाढ तुटीची बाजू लक्षात घेता शासनाकडून मिळणारे रु.१०० कोटी अनुदान, म.न.पा.कडून मिळणारे अंशदान मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात यावा अशी सूचना केली व उपकरप्राप्त इमारतीतील अपघातग्रस्त लोकांना तांतडीचे आर्थिक सहाय्य उपलब्ध होण्याकरिता अर्थसंकल्पात रु.२५ लाखाची तरतुद केल्याबद्दल उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशांना दिलासा मिळणार आहे त्याबद्दल मा. मुख्य अधिकारी यांचे अभिनंदन केले व अर्थसंकल्प मंजूर करण्यास सहमती दर्शविली.

मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, रु.१०० कोटीचा निधी वाढविण्यासाठी डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत असून मुंबई शहर जिल्हयाच्या डी.पी.डी.सी.ने ही याची शिफारस केली आहे.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली की, अर्थसंकल्पातील तूट भरुन काढण्यासाठी तज्ञ अधिका-यांची मदत घ्यावी. यावर श्री. तपासे, मुख्य लेखाधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळांना मंजूर फंडातूनच कामे करावी लागत असल्यामुळे फायदा किंवा तोटयाचा प्रश्न उद्भवत नाही. अर्थसंकल्प हा तुटीचा असला तरी अतिरिक्त अनुदानाची मागणी करता येते.

मा..सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशीही सूचना केली की, आवश्यक ती माहिती तातडीने उपलब्ध होण्यासाठी उपमुख्य अभियंता, उपमुख्य अधिकारी इ. वरिष्ठ अधिका-यांसाठी लॅपटॉप उपलब्ध करुन देण्यात यावा व त्याची तरतुद अर्थसंकल्पात करण्यात यावी. तसेच संपूर्ण मंडळाचे कंप्युटरायझेन करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, संपूर्ण म्हाडाचे संगणकीकरण प्राधिकरणाच्या निधीमधून प्रस्तावित असल्यामुळे मंडळाच्या अर्थसंकल्पात त्याची तरतुद करण्यात आलेली नाही. मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी त्यांनी केलेली सूचना लक्षात घेऊन उपकरप्राप्त इमारतीतील अपघातग्रस्त लोकांना तांतडीचे आर्थिक सहाय्य उपलब्ध होण्याकरिता अर्थसंकल्पात रु.२५ लाखाची तरतुद केल्याबद्दल मा. मुख्य अधिकारी यांचे आभार मानले. मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी अशीही सूचना केली की, मा. सदस्यांना म्हाडाची माहिती ऑन लाईन मिळण्यासाठी सर्व सदस्यांना लॅपटॉप देण्यात यावा व त्यासाठी पुढच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.

वरील सविस्तर चर्चेअंती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचा सन २००९-१० चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१०-११ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

<u>ठराव क्रमांक</u> : १२३/१०३१

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचा सन २००९-१० चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०१०-११ चा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर करण्यात येऊन सदर ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाहीसाठी प्राधिकरणाकडे पाठविण्याचे सर्वानुमते ठरले.

-----------------------------oo-----------------------------

## मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेसाठी घेण्यात आलेले विषय

मा..सदस्य श्री. सुबोध बांदिवडेकर यांनी असे निदर्शनास आणले की, क्लस्टर डेव्हलपमेंटबाबत हाय पॉवर कमिटी निर्णय घेते. मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांच्या मतदारसंघातील ओम साई सदन या पुनर्रचित इमारतीच्या पुनर्विकासासाठी विकासकास ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. संबंधित विकासक दहशत निर्माण करुन रहिवाशांकडून संमतीपत्रे घेत आहे तसेच म्हाडाच्या संपादित जागेवर तो स्वतःचे कार्यालय बांधत आहे. एन.ओ.सी. मिळाल्यानंतर अशाप्रकारचे अधिकार त्याला प्राप्त होतात का ? तो मालक होतो का ? यावर मा. मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, क्लस्टरमध्ये जर शासकीय/महापालिका अथवा म्हाडाची जमीन येत असेल तर ती देण्याची तरतुद नियमात केली आहे. त्याप्रमाणे उच्चाधिकार समितीने निर्णय घेतला असेल तथापि जर काही समस्या असतील तर त्या सोडविणे आवश्यक आहे. मा. सदस्या श्रीमती. पाटकर यांनी क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी ७०% संमतीची अट असते का ? अशी विचारणा केली असता मा. मुख्य अधिकारी यांनी योजनेस तत्वतः मंजूरी देण्याकरिता एकूण रहिवाशांच्या ७०% संमती असणे गरजेचे आहे तसेच एकूण भूखंडापैकी ७०% भूखंडांच्या मालकांची देखील संमती असणे गरजेचे आहे अशी माहिती दिली.

मा..सदस्य श्री.हेमराज शहा यांनी अशी सूचना केली की, मंडळाने ना.ह.प्र.पत्र दिल्यानंतर किती विकासक ना.ह.प्र.पत्र घेऊन गेले, किती विकासकांनी काम केले वगैरे सद्यस्थितीबाबतची माहिती त्यांना देण्यात यावी. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी ना.ह.प्र.पत्र सद्यस्थितीबाबतची अद्यावत माहिती संकलित करण्याचे काम कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर चालू असून सदर माहिती प्राप्त झाल्यावर मा. सदस्यांना देण्यात येईल असे सांगितले.

बैठकीच्या अखेरीस सचिव यांनी बैठकीचे अध्यक्ष व मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी व सर्व सन्मा.सदस्य व इतर सवा उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांचे अनुमतीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

मुख्य लेखाधिकारी,मु.इ.दु.व पु.मंडळ

सचिव/मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ